**ठळक बातम्या**

- भारत आणि मंगोलियामध्ये द्विपक्षीय चर्चा, मंगोलियाच्या नागरिकांना मोफत ई-विजा देण्याचा भारताचा निर्णय

- राजस्थानमध्ये बसला लागलेल्या आगीत १० जणांचा मृत्यू, १४ जखमी

- भारतातून अमेरिकेला जाणारी टपाल सेवा उद्यापासून पुन्हा सुरू होणार

**आणि**

- वेस्ट इंडिज विरुद्धची कसोटी मालिका भारतानं जिंकली, कुलदीप यादव सामनावीर, तर रविंद्र जडेजा मालिकावीर

**<><><><><><>**

भारत आणि मंगोलिया हे दोन्ही देश समान सांस्कृतिक परंपरा, लोकशाही मूल्यं आणि विकासासाठी वनचबद्ध असून दोन्ही देशांचे संबंध विश्वास आणि मैत्रीच्या पायावर उभे असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. मंगोलियाचे अध्यक्ष खुरेलसुख उखना यांच्यासोबत नवी  दिल्लीत झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर संयुक्त वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. गेल्या दशकभरात भारत आणि मंगोलिया यांच्यातली भागीदारी अधिकाधिक दृढ  होत आहे, ग्लोबल साऊथचा आवाज बुलंद करण्यासाठी दोन्ही देश काम करत आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले. भारताने मंगोलियाच्या विकासात केलेल्या सहयोगाबद्दलही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. भारताच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पामुळे मंगोलियाच्या ऊर्जा सुरक्षेत वाढ होईल. तसंच मंगोलियन नागरिकांसाठी निःशुल्क ई व्हिसा देण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याची माहितीही त्यांनी दिली.

**होल्ड बाईट मोदी (२४ सेकंद)**

त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मंगोलियाचे अध्यक्ष खुरेलसुख उखना यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली. या बैठकीत द्विपक्षीय संबंधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला, तसंच काही सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. भारत भेटीवर आलेले राष्ट्राध्यक्ष खुरेलसुख उखना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनाही भेटणार आहेत.

**<><><><><>**

आंध्रप्रदेशातल्या विशाखापट्टणम इथं एआय हब स्थापन करण्यासाठी पुढची पाच वर्षं १५ अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक करणार असल्याची घोषणा गुगलनं आज केली. नवी दिल्लीत सुरू असलेल्या भारत एआय शक्ती या कार्यक्रमात ही घोषणा करण्यात आली. एक गिगावॅट स्केल डेटा सेंटर पायाभूत सुविधा असलेल्या या हबमुळे विशाखापट्टणम जागतिक नवोन्मेषाचं केंद्र म्हणून उदयाला येईल. देशाचं डिजिटल भविष्य आणि शाश्वत विकासासाठी गुगल वचनबद्ध आहे हे या गुंतवणुकीतून दिसतं असं गुगल क्लाउडचे सीईओ थॉमस कुरियन म्हणाले. एआय हबमुळे डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, नागरिकांना आधुनिक साधनं मिळतील, तसंच जागतिक स्तरावर भारत तंत्रज्ञानच्या क्षेत्रात अग्रेसर होईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र सरकारनं आगामी ५ वर्षांसाठीच्या बांबू धोरणाला आज मंजुरी दिली. यामुळं ५० हजार कोटींची गुंतवणूक आणि ५ लाख रोजगार निर्मितीची शक्यता आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयांविषयी सविस्तर जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड (१.१७ सेकंद)**

*(राष्ट्रीय बांबू मिशन आणि महाराष्ट्र मिशन २०२३ शी सुसंगत बांबू धोरणाला राज्य मंत्रीमंडळाची आज मंजुरी मिळाली. या धोरणात बांबू शेतकरी उत्पादक संघटना (FPO), कंत्राटी शेती आणि ऊर्जा, उद्योग आणि इतर घरगुती क्षेत्रांमध्ये बांबूच्या वापराला प्रोत्साहन दिलं जाणार आहे. राज्यभरात १५*

*बांबू क्लस्टर्स स्थापन केले जाणार असून दुर्गम भागातल्या बांबू कारागीरांसाठी सुविधा केंद्रे सुरू केली जातील. बांबूशी निगडीत प्रक्रिया उद्योगांना व्याज अनुदान, वीज अनुदान तसेच मुद्रांक शुल्क आणि वीज शुल्क सवलती दिल्या जातील. याशिवाय विविध वित्तीय संस्थांकडून भांडवल पुरवण्यासाठी मदत केली जाईल. हे धोरण राबवण्यासाठी १ हजार ५३४ कोटी रुपयांच्या तरतुदी मंत्रीमंडळानं मंजूर केल्या. द पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विविध शैक्षणिक संस्था, वसतिगृहांच्या इमारतींचा जीर्णोद्धार, जतन आणि संवर्धन करण्याकरिता स्वतंत्र योजना राबवायलाही आज मंत्रिमंडळानं मान्यता दिली. या योजनेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या नऊ शैक्षणिक संस्था आणि दोन वसतिगृहांचे जतन आणि संवर्धन केले जाणार आहे. यासाठी पुढील पाच वर्षात, दरवर्षी १०० कोटी याप्रमाणे ५०० कोटी रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाकरिता नव्याने २ हजार २२८ पदांची निर्मिती करायलाही मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली. )*

**<><><><><>**

राज्यात रस्त्यावरच्या खड्ड्यांमुळे अपघात होऊन मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबांना ६ लाख रुपये नुकसानभरपाई द्यायचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं आज संबंधित महानगरपालिकांना दिले. तसंच, अशा दुर्घटनांमध्ये जखमी झालेल्यांना ५० हजार ते अडीच लाख रुपयांपर्यंत नुकसानभरपाई द्यावी, असं न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या पीठानं सांगितलं. चांगले आणि सुरक्षित रस्ते हा राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत नागरिकांच्या जगण्याच्या हक्काचा भाग आहे, असा पुनरुच्चारही पीठानं केला.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाची ७१ उमेदवारांची पहिली उमेदवार यादी आज जाहीर झाली. उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी तारापूर मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. तर दुसरे उपमुख्यमंत्री विजय सिन्हा, लखीसराईतून निवडणूक लढवतील. मंगल पांडेय, नितीन नबीन, रेणू देवी, या आजी-माजी मंत्रिमंडळ सदस्यांचा यादीत समावेश आहे. केंद्रीय मंत्री रामकृपाल यादव यांना दानापूरमधून तिकिट मिळालं आहे. हिंदुस्थानी आवामा मोर्चानंही ६ उमेदवारांची

यादी जाहीर केली आहे. दरम्यान भक्तिसंगीत गायिका मैथिली ठाकूरनं आज पाटणा इथं भाजपात प्रवेश केला.

<><><><><><>

राजस्थानमध्ये जोधपूर महामार्गावर एका खासगी बसला लागलेल्या आगीत किमान १० जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची भीती आहे, तर १४ पेक्षा जास्त जण गंभीररीत्या भाजले आहेत. जखमींवर जोधपूरच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आगीचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आणि घटनास्थळाला भेट दिली. उपमुख्यमंत्री दिया कुमारी यांनीही या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं.

<><><><><><>

भारतातून अमेरिकेला जाणारी टपाल सेवा उद्यापासून पुन्हा सुरू होणार आहे. अमेरिकेच्या आयात शुल्क धोरणांच्या अंमलबजावणीनंतर २२ ऑगस्ट २०२५ पासून ही सेवा स्थगित करण्यात आली होती. नवीन रचनेनुसार भारतातून टपालाने अमेरिकेत पाठवण्याच्या पार्सलवर भारतातच शुल्क वसुली होईल. अमेरिकेत प्रवेश करताना त्यावर पुन्हा उत्पादननिहाय शुल्क आकारलं जाणार नाही. मात्र ही सुविधा फक्त केंद्र सरकारच्या टपाल विभागालाच उपलब्ध आहे. खासगी कुरियर तिचा लाभ घेता येणार नाही.

<><><><><><>

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज ग्राहकांना घरापर्यंत मालवाहतूक आणि पार्सल सेवा देणाऱ्या रेल्वेच्या तीन नवीन सेवांचं उद्घाटन केलं. दिल्ली-कोलकाता मार्गावर ट्रान्झिट कंटेनर सेवा आणि मुंबई-कोलकाता रेल्वे पार्सल व्हॅन या दोन सेवांचा यात समावेश आहे. या सेवेद्वारे मालाची सुरक्षित हाताळणी होईल, आणि तो वेळेवर अपेक्षित स्थळी पोहोचण्याची खात्री मिळेल. तसंच वाहतुकीचा खर्च कमी होईल, असं वैष्णव यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

बांगलादेशातल्या ढाकामध्ये रसायन कारखान्यात लागलेल्या आगीतल्या मृतांची संख्या १६ वर पोहोचली आहे. मृतांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता असून बचावकार्य सुरू आहे. विषारी वायूमुळे हे मृत्यू झाले असल्याचा अंदाज अग्निशमन विभागानं व्यक्त केला आहे.

**<><><><><><>**

व्हेनेझुएलामध्ये एल कॅलाओ प्रभागात मुसळधार पावसामुळे एका खाणीचा आतला भाग कोसळून झालेल्या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला. या ठिकाणी बचाव कार्य सुरू असल्याचं स्थानिक प्रशासनानं सांगितलं. एल कॅलाओ शहर सोन्याच्या खाणींसाठी प्रसिद्ध असून, इथले बहुसंख्य नागरिक प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे खाणकामाशी संबंधित आहेत.

**<><><><><><>**

मादागास्करमध्ये कायदा आणि सुव्यवस्था पुन्हा प्रस्थापित व्हावी, यासाठी संसदेचं कनिष्ठ सभागृह विसर्जित करण्यात आल्याची घोषणा अध्यक्ष अँड्री राजोएलिना यांनी आज केली. त्यामुळे येत्या ६० दिवसांमध्ये निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा होईल असं त्यांनी म्हटलं आहे. राजोएलिना यांच्या राजीनाम्याची मागणी करत मादागास्करमधल्या युवा पिढीनं छेडलेल्या देशव्यापी आंदोलनाला हिंसक वळण लागल्यामुळे ते देश सोडून सुरक्षित ठिकाणी गेले आहेत.

**<><><><><><>**

अमेरिकेनं लादलेल्या अतिरिक्त आयात शुल्कानंतरही चालू आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक वृद्धी दर ६ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील असा सुधारित अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं वर्तवला आहे. यापूर्वी हा दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील, असं नाणेनिधीनं म्हटलं होतं. पहिल्या तिमाहीत आर्थिक वृद्धीदर मोठ्या प्रमाणात वाढल्यानं ही सुधारणा दिसून येईल.

**<><><><><><>**

क्रिकेटमधे वेस्ट इंडीजविरुद्धचा दुसरा कसोटी सामना भारतानं ७ गडी राखून जिंकला. या विजयामुळं भारतानं ही मालिकाही २-० अशी जिंकली आहे. वेस्ट इंडिज विरोधात कसोटी मालिकेतला भारताचा हा सलग १० वा विजय आहे. या सामन्यात कुलदीप यादव सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला, तर मालिकावीराचा मान रविंद्र जाडेजाला मिळाला.

//<><><><><><>//